# मुंबई विद्यापीठ

डॉ. मोहन ना. आमृळे
संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण
Email Id: sports.mudept@gmail.com
Website: www.mu.ac.in

विद्यापीठ क्रीडा संकुल, मरिन लाईन्स,
मुंबई – ४०० ०२०.
दुरध्वनी क्र.: ०२२ २२८२६०२७/
२२८१७६९८


## विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ

परिपत्रक –क्र.क्रीडा/१५/२०२३–२४

दिनांक: १३/०७/२०२३

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक,
मुंबई विद्यापीठातील सर्व संलग्न महाविद्यालये व
मान्यताप्राप्त संस्था.

**विषय:– मुंबई विद्यापीठ संलग्नित वरिष्ठ महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालकांचे द्वितीय (दुसरे) चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीर शैक्षणिक वर्ष २०२३–२४ बाबत.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयांन्वये आपणांस या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम – २०१६ अंतर्गत, कलम २४ च्या अधिन राहून मुंबई विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांची व्याप्ती लक्षात घेता, ग्रामीण भागातील खेळाडूंना जास्तीत जास्त आंतर महाविद्यालयीन स्पर्धांमध्ये सहभाग घेता यावा, खेळाडूंचा आर्थिक भार व प्रवासाचा त्रास कमी व्हावा या दृष्टीने शैक्षणिक वर्ष २०२०–२१ मध्ये विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळातर्फे नव्याने तयार करण्यात आलेल्या आंतर महाविद्यालयीन व आंतर विभागीय स्पर्धा प्रक्रियाची नियमावली व कार्यपद्धतीची रचना तयार करण्यात आली. परंतू माहे मार्च – २०२० ते माहे नोंव्हेंबर – २०२१ या कालावधीत जगभरात उद्‌भवलेल्या कोविड–१९ च्या प्रादृर्भावाच्या अभावामुळे उपरोक्त स्पर्धा ह्या आयोजित होऊ शकल्या नाहीत तथापि क्रीडा विभागातर्फे संलग्नित महाविद्यालयांच्या माहितीस्तव दि. ०९ डिसेंबर, २०२० ते दि. ११ डिसेंबर, २०२० या कालावधील ऑनलाईन शिबीराचे आयोजन करण्यात आले. तसेच शैक्षणिक वर्ष २०२१–२२ करीता अखिल भारतीय विश्वविद्यालय अंतर्गत होणाऱ्या पश्चिम विभागीय/आंतर विभागीय आंतर विद्यापीठ व अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धा ह्या डिसेंबर – २०२१ पासुन पुढे आयोजित करण्यात आल्या त्यामुळे विद्यापीठ क्रीडा विभागातर्फे कोविड – २०१९ व ओमायक्रॉनच्या प्रादुर्भावाचा अभावामुळे उपलब्ध झालेला कमी कालावधी लक्षात घेता मुंबई विद्यापीठ प्रशासनाच्या पुर्व परवानगीने शैक्षणिक वर्ष २०२१–२२ करीता आंतर विद्यापीठ स्पर्धाकरीता विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील खेळाडूंची निवड चाचणी निश्चित करुन हि संबंधित खेळातील निकषांची पुर्तता करुन त्या खेळाडूंना पश्चिम विभागीय/आंतर विभागीय आंतर विद्यापीठ व अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धांमध्ये सहभागाकरीता पाठविण्यात आले.

UNIVERSITY OF MUMBAI SPORTS & PHY. EDN.

— पान क्र. २ —

मुंबई विद्यापीठ

डॉ. मोहन ना. आमृळे
संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण
Email Id: sports.mudept@gmail.com
Website: www.mu.ac.in

विद्यापीठ क्रीडा संकुल, मरिन लाईन्स,
मुंबई – ४०० ०२०.
दुरध्वनी क्र.: ०२२ २२८२६०२७/
२२८१७६९८

विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ



परंतू सद्यस्थितीत कोविड – १९ व ओमायक्रॉनच्या प्रादुर्भावांचा अभाव कमी प्रमाणात असल्याने पुढील आगामी शैक्षणिक वर्ष २०२२–२३ करीता विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळातर्फे तयार करण्यात आलेल्या विभागीय आंतर महाविद्यालयीन स्पर्धांच्या व आंतर विभागीय स्पर्धा आयोजनासंदर्भात विद्यापीठ नियमावली, विभाग निश्चिती, विभागीय रचना व कार्यपद्धतीच्या प्रणालीची अंमलबजावणी होणेसाठी व याविषयी विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयाच्या क्रीडा प्रतिनिधी समवेत चर्चा करुन तसेच या कार्यवाहीमधील अभिप्राय व त्यांच्या शंकाचे निसरण करुन स्पर्धा ह्या विभागीय स्तरांवर घेणे, जेणेकरुन विद्यार्थी/खेळाडूंना न्यायिक/स्पर्धात्मक वातावरण तयार होऊन नव्या जोमाने खेळाडूंचा सहभाग वाढला आहे. यामध्ये काही अडचणी/त्रुटी आल्या आहेत त्यावर सविस्तर चर्चा/विनिमये घेऊन विद्यापीठीय संघ हा पश्चिम विभागीय/आंतर विभागीय/अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धा २०२३–२४ करीता सहभागास सुसज्ज/तयार होणेकरीता क्रीडा व शा. शिक्षण मंडळाच्या विद्यमाने व के. एम्. सी. महाविद्यालय, खोपोली या महाविद्यालयाच्या सौजन्याने शारीरिक शिक्षण संचालकांचे चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीर हे बुधवार दि. १९ जुलै, २०२३ ते शनिवार दि. २२ जुलै, २०२३ या कालावधीत दिलकप अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन अभ्यास संशोधन संस्था, मु.गाव – मंमदापूर, पोस्ट – नेरळ, तालुका – कर्जत, जिल्हा: रायगड – ४१० १०१. **(Dilkap Research Institute of Engineering and Management Studies, At Village – Mamdapur, Post – Neral, Tal.- Karjat, Dist. Raigad – 410 101)** येथे आयोजित करण्यात येणार आहे.

या चर्चासत्रात मुंबई विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील व मान्यताप्राप्त संस्थामधील क्रीडा प्रतिनिधींना खाली नमूद केलेल्या क्रमप्राप्तीप्रमाणेच उपस्थित राहणे अनिवार्य राहिल.

अ) महाविद्यालयाचे मान्यताप्राप्त संचालक, शारीरिक शिक्षण व क्रीडा,

किंवा

ब) कनिष्ठ महाविद्यालयाचे मान्यताप्राप्त क्रीडा शिक्षक **(M.P.Ed.)** पदवी प्राप्त अथवा वरिष्ठ महाविद्यालयाचे क्रीडा शिक्षक **(M.P.Ed.)** पदवी प्राप्त,

किंवा

क) महाविद्यालयाचे पुर्ण वेळ इतर विषयांचे शिक्षक हे क्रीडा प्रमुख म्हणून काम करीत आहे.

वरील व्यतिरीक्त इतर प्रतिनिधींना शिबीरात सहभागी करुन घेण्यात येणार नाही. तसेच चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीराच्या पुर्व नोंदणीकरीता खालील प्रमाणे गुगल लिंक फॉर्म/Google link form उपलब्ध करण्यात आलेला आहे. आपण क्रीडा प्रतिनिधी/शिबीरार्थींनी याचा वापर करावा.

https://forms.gle/Cv8Hk4n8pVMA8MP1A

— पान क्र. ३ —

UNIVERSITY OF MUMBAI SPORTS & PHY. EDUN.

मुंबई विद्यापीठ

डॉ. मोहन ना. आमृळे
संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण
Email Id: sports.mudept@gmail.com
Website: www.mu.ac.in

विद्यापीठ क्रीडा संकुल, मरिन लाईन्स,
मुंबई – ४०० ०२०.
दुरध्वनी क्र.: ०२२ २२८२६०२७/
२२८१७६९८

## विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ



या क्रीडा चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीराबाबतची माहिती आपल्या महाविद्यालयाच्या प्रतिनिधींना खालील सुचना निर्देशित करणे, हि विनंती.

१) **महाविद्यालयीन क्रीडा प्रतिनिधींना/शिबीरार्थींना चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीरास उपस्थित राहण्याबद्दल संबंधितांचा दैनंदिन भत्ता, प्रवास खर्च व इतर अनुषंगिक खर्च हा संबंधित महाविद्यालयास करावा लागेल. याबाबतची पूर्वपरवानगी विद्यापीठ प्रशासनाकडून मिळालेली आहे.**

२) चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीराचा कालावधी एकुण चार दिवसांचा असेल. (कालावधी – बुधवार दि. १९ जुलै, २०२३ ते शनिवार दि. २२ जुलै, २०२३). प्रत्येक शिबीरार्थीस नोंदणी शुल्क रु. ८००/– (आठशे रुपये फक्त) प्रतिदिनी याप्रमाणे एकुण रु. ३,२००/– (तीन हजार दोनशे रुपये फक्त) व अनामत रक्कम म्हणून रु. २,०००/– (दोन हजार रुपये फक्त) रक्कम सहभागी होणाऱ्या प्रतिनिधींनी बुधवार दि. १९ जुलै, २०२३ रोजी नावनोंदणी करतेवेळी चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीर आयोजन करणाऱ्या महाविद्यालयाकडे रोख स्वरुपात जमा करणे क्रमप्राप्त राहिल. सदर दोन्ही रक्कमेची रितसर पावती सहभागी क्रीडा प्रतिनिधींना देण्यात येईल. तसेच दि. १९ जुलै, २०२३ रोजी रु. २,०००/– (दोन हजार रुपये फक्त) अनामत रक्कमेची पावती सादर केल्यानंतरच क्रीडा प्रतिनिधींना रु. २,०००/– चा परतावा करण्यात येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

३) **चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीरास उपस्थित राहणाऱ्या क्रीडा प्रतिनिधीची निवास व्यवस्था, नाश्ता, चहापान, भोजन व्यवस्था व आवश्यक स्टेशनरी संयोजक महाविद्यालयाकडून देण्यात/करण्यात येईल.**

४) बुधवार दि. १९ जुलै, २०२३ रोजी चर्चासत्राच्या ठिकाणी दुपारी १२.०० वाजेपर्यंत सर्व क्रीडा प्रतिनिधींनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. प्रत्येक सहभागी प्रतिनिधी/शिबीरार्थीजवळ नांव नोंदणी करताना आपण ज्या महाविद्यालयात कार्यरत आहात व शिबीरास उपस्थित राहण्याबाबतचे **मा. प्राचार्यांचे संमतीपत्र सादर करणे बंधनकारक राहिल. अन्यथा संबंधित प्रतिनिधी/शिबीरार्थी यांना उपरोक्त चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीरास सहभाग नोंदविता येणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.**

<u>सविस्तर टिप:–</u>

**दिलकप अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन अभ्यास संशोधन संस्था हि नेरळ रेल्वे स्टेशनहून २.५ किमी. च्या अंतरावर आहे. या स्थानिक प्रवासासाठी ऑटोरिक्शा ही रु. ६०/– (Direct) तसेच रु. २०/– (Sharing) आकारण्यात येते यांची नोंद असावी.**

UNIVERSITY OF MUMBAI ★ SPORTS & PHY. EDUN. ★

— पान क्र. ४ —

मुंबई विद्यापीठ

डॉ. मोहन ना. आमृळे
संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण
Email Id: sports.mudept@gmail.com
Website: www.mu.ac.in

विद्यापीठ क्रीडा संकुल, मरिन लाईन्स,
मुंबई – ४०० ०२०.
दुरध्वनी क्र.: ०२२ २२८२६०२७/
२२८१७६९८

## विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ



५) या चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीराच्या कालावधीत कोणत्याही क्रीडा प्रतिनिधी/शिबीरार्थींना खाजगी कामाकरीता अन्य ठिकाणी जाण्याची कोणत्याही प्रकारची सवलत दिली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. बुधवार दि. १९ जुलै, २०२३ ते शनिवार दि. २२ जुलै, २०२३ या चार दिवसांच्या कालावधीत होणाऱ्या शिबीराच्या प्रत्येक कार्यक्रमास उपस्थित राहणे अनिवार्य असेल तद्नंतरच संबंधित शिबीरार्थीस शिबीरास उपस्थितीबाबतचे **प्रमाणपत्र व कार्यमुक्ती आदेश (Reliving Order)** देण्यात येईल.

६) चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीर **उद्घाटन व समारोपदिनी** सहभागी क्रीडा प्रतिनिधी/शिबीरार्थींनी पांढरा गणवेश (पोशाख) असणे आवश्यक आहे, नसल्यास किमान पांढरा शर्ट/टि–शर्ट आवश्यक राहिल.

७) **या चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीराकरीता डॉ. प्रदिप सेठिया, श्री. रुपेश थोपटे, डॉ. विश्वभंर जाधव तसेच मुंबई शहर, मुंबई उपनगरे, ठाणे जिल्हा व कोकण विभागीय सचिवांचे मार्गदर्शन होणार असून योगासने व इतर विविध विषयांवर व्याख्याने व प्रात्याक्षिक देणार आहेत.**

शिबीरार्थींना महत्त्वाच्या सुचना:–

१. शिबीरार्थींनी शिबीरास येताना **मौल्यवान वस्तू अथवा रोख रक्कम** ही स्वत: च्या जबाबदारीवर आणावी.
२. निवासाची व्यवस्थेत क्रीडा प्रतिनिधींना प्रत्येकी रुममध्ये (३) तीन व्यक्ती अशाप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात येईल.
३. बुधवार दि. १९ जुलै, २०२३ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंतच्या कालावधीत दिलकप अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन अभ्यास संशोधन संस्था, मंमदापूर, नेरळ येथे स्वागत व नोंदणीकक्ष येथे उपस्थित राहावे.
४. प्रत्येक सहभागी क्रीडा प्रतिनिधींनी आपल्या महाविद्यालयांचे ओळखपत्र सादर करणे बंधनकारक राहिल.
५. आयोजक महाविद्यालयाकडून क्रीडा प्रतिनिधी/शिबीरार्थींना निवासाकरीता फक्त बेड व गादी देण्यात येणार आहे. आपण सोबत येताना वैयक्तिक बेडशिट, चादर व इतर तत्सम वस्तू आणाव्यात.
६. सर्व सहभागी क्रीडा प्रतिनिधींनी योगासनाच्या व्यायाम प्रकार करण्यासाठी आपल्या सोबत ट्रॅकसुट, टि–शर्ट, स्पोटर्स शुज असणे आवश्यक आहे.
७. सर्व शिबीरार्थींनी (~~पुरुष व~~ महिला) एक कापडी ओढणी सोबत आणावी. (वरील विविध ताणाचे व्यायाम करण्यासाठी)
८ शिबीरास येताना विद्यापीठाने तयार केलेली क्रीडा स्पर्धाची नविन विद्यापीठीय रचना व नियमावलीची एक प्रत सोबत आणावी.

UNIVERSITY OF MUMBAI
SPORTS & PHY. EDUN.

— पान क्र. ५ —

डॉ. मोहन ना. आमृळे
संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण
Email Id: sports.mudept@gmail.com
Website: www.mu.ac.in

# मुंबई विद्यापीठ

विद्यापीठ क्रीडा संकुल, मरिन लाईन्स,
मुंबई – ४०० ०२०.
दुरध्वनी क्र.: ०२२ २२८२६०२७/
२२८१७६९८

## विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ



कृपया सदरचे पत्र आपल्या महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक, क्रीडा प्रमुख व क्रीडा प्रतिनिधींच्या निदर्शनास आणून या शिबीरातील क्रीडा क्षेत्रातील आधुनिक बाबीं आत्मसात करण्यासाठी अवश्य उपस्थित राहण्यास सांगावे.

धन्यवाद! सहकार्याचे अपेक्षेत.

UNIVERSITY OF MUMBAI * SPORTS & PHY. EDUN. *

आपला,

डॉ. मोहन ना. आमृळे
संचालक,
क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ

प्रत माहितीकरीता रवाना;

१) मा. कुलगुरु,
२) मा. प्र–कुलगुरु,
३) मा. कुलसचिव,
४) मा. वित्त व लेखाधिकारी,
५) मा. जनसंपर्क अधिकारी,
६) मा. सदस्य, विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ,
७) मा. प्राचार्य, के.एम्.सी. महाविद्यालय, खोपोली,
८) मा. शारीरिक शिक्षण संचालक, के.एम्.सी. महाविद्यालय, खोपोली.